# आपली बस ग्रीन इतिहासाची सुरवात. नितीन गडकरी



**आपली बस लोकार्पण**

दिल्लीतील प्रदूषणाच्या समस्येने गांभीर्याची पातळी ओलांडली आहे, या धर्तीवर नागपुरात पर्यावरणपूरक, प्रदूषणरहित इथेनॉल वर चालणाऱ्या ग्रीन बसेस व नवीन प्रगत रेड बसेसचे लोकार्पण म्हणजे नागपुरात ग्रीन इतिहासाची सुरवात असल्याचे विधान केंद्रीय भूपृष्ठ परिवहन महामार्ग आणि जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ते यशवंत स्टेडियम परिसरात सोमवारी नागपूर महानगर पालिका परिवहन विभागातर्फे " आपली बस" लोकार्पण सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. याप्रसंगी मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून ऊर्जा मंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, आ. अनिल सोले, आ. गिरीश व्यास, आ. कृष्णा खोपडे, आ. सुधाकर देशमुख, आ. विकास कुंभारे, आ. डॉ. मिलिंद माने, आ. सुधाकर कोहळे, सत्ता पक्ष नेते दयाशंकर तिवारी,मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, अपर आयुक्त रामनाथ सोनवणे, परिवहन समितीचे सभापती नरेंद्र (बाल्या) बोरकर, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर प्रवीण दटके हे होते. पुढे बोलताना गडकरी म्हणाले, कि ग्रीन बस हि एक आदर्श प्रकल्पाची सुरवात असून "ग्रीन- फ्युएल" हे आमचं मिशन आहे फक्त 55 बसेस न्हवे तर शहरातील सर्वच बसेस या इथेनॉल वर चालले पाहिजे. " वेस्ट पासून वेल्थ " निर्माण करणं हेच आमचं ध्येय आहे, नागपूरकरांना वातानुकुलीत सार्वजनिक दळणवळणाचा पर्याय उपलब्ध व्हावा. या देशाचा शेतकरी उसापासून इथेनॉल निर्माण करून पेट्रोल,डिझेलला पर्याय देऊ शकतो हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. ई- रिक्षाचीही सुरुवात करण्यात आली आहे. नागपूर मनपा देशातील एकमेव अशी महानगरपालिका आहे जी सांडपाण्यावर प्रकिर्या करून उत्पन्न मिळवते, या सिव्हरेज वॉटर प्रक्रिया प्रकल्पाची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. ग्रीन बस प्रकल्पामुळे प्रदूषण मुक्त नागपूरची संकल्पना साकार होईल, नागरिकांना कमी पैशात प्रवास करता येईल,याशिवाय वैशिष्ठपूर्ण आणि अद्यावत ॲप मुळे नागरिकांना बस बाबतची सर्व माहिती मोबाईलच्या माध्यमातून कळेल. याप्रसंगी गडकरी यांनी सांडपाण्यातून मिथेन काढून बसेस चालवता येईल असे सूचविले.

याप्रसंगी मुख्यमंत्री यांनी नागपूर महानगरपालिकेचे अभिनंदन करताना देशात पहिले स्मार्ट व पहिले ग्रीन ट्रान्सपोर्टची सुरवात केली असल्याचे सांगितले. केंद्रीय परिवहन मंत्री गडकरी यांनी नागपूच्या नागरिकांना प्रदूषणमुक्त व

पर्यावरणयुक्त करण्याचे स्वप्नं पाहिले होते. मात्र गडकरी हे फक्त स्वप्नं दाखवणारे नसून स्वप्नं पूर्ण करणारे मंत्री असल्याचे विधान केले. नागपूर विकासाचा मॉडेल या ग्रीन बसच्या माध्यमातून महापौर यांनी तयार केले ज्याचा आदर्श देशासमोर आहे, हाच आदर्श महाराष्ट्राच्या इतर महानगरपालिकेतही राबविला जाणार. ग्रीन बस हि सुंदर, अनोखी आणि अनुठी संकल्पना मनपाने आपल्या नागरिकांना दिली, या प्रकल्पासाठी जागेची गरज असून अधिवेशन पूर्ण होण्यापूर्वीच जागेची समस्या सोडविली जाईल अशी ग्वाही यावेळी मा. मुख्यामंत्री यांनी दिली, नागपूर अधिवेशन हे विदर्भाचे प्रश्न सोडवण्या करीताच असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी गडकरी यांचे महाराष्ट्र हे राज्य अशाच ग्रीन बस सारख्या प्रकल्पातून देशात आघाडीवर असेल असे आश्वासन दिले.

दोन वर्षांपूर्वी नागपुरात पहिली इथेनॉलवर चालणारी देशातील प्रदूषणमुक्त बस धावली, आज त्याची संख्या ५५ वर पोहोचली, 3 ऑपरेटर आणखी 100 बसेस घेऊन येणार आहे, यामध्ये GPS सिस्टीम बसवण्यात आली आहे, नागरिकांसाठी या बसेस आरामदायी, सर्व सोयींनी युक्त असतील असे सांगतांना महापौर यांनी हि हरित बसच्या लोकार्पणाचा हा ऐतिहासिक क्षण असून नागपूरच्या इतिहासात सुर्वर्ण अक्षराने लिहिल्या जाईल असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन सत्ता पक्ष नेते दयाशंकर तिवारी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नरेंद्र बोरकर यांनी मानले.

••••••••••••••••••••••

# साडे बारा लाख नागरिकांपर्यंत स्वच्छता ॲप पोहचविण्याचे मनपाचे लक्ष्य



**स्वच्छता अभियंतासाठी पार पडली कार्यशाळा**

नागरिकांना प्रत्यक्ष झोनमध्ये येवून तक्रार करण्याची गरज नाही याकरिता नागपूर महानगर पालिका तर्फे केंद्र सरकारच्या “स्वच्छ व आरोग्यदायी देश या अभियाना अंतर्गत राबविण्यात येणा-या स्वच्छता ॲप ची सुविधा आता नागपूरकरांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंगळवार १३ डिसेंबर २०१६ रोजी मनपाच्या नव्या प्रशासकीय ईमारतीतील सभागृहात, मनपाच्या स्वच्छता विभागातील अभियंतांसाठी या बाबतची कार्यशाळा पार पडली.

यावेळी प्रोजेक्टरच्या माध्यमातून स्वच्छता ॲप विषयी सविस्तर माहिती प्रदान करण्यात आली. तक्रार करतांना सर्वात प्रथम आपल्या मोबाईल मध्ये हा ॲप डाऊनलोड करावा लागेल, तसेच त्यांचा मोबाईल क्रमांक नोंदणीकृत करावा लागेल. यादवारे त्यांचा अधिकृत नंबर हा ओ.टी.पी. दवारे तपासल्या जाईल. यानंतर त्यांच्या तक्रारींची नोंद झोन निहाय वर्गीकृत करून झोन अभियंतांकडे पाठवले जाईल, १२ तासांच्या आत त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल. यावेळे दरम्यान तक्रार निवारण्यास वेळ लागल्यास २४ तासांनंतर उच्चस्तरावर तक्रारींची दखल घेऊन आयुक्तांकडे पाठविले जाईल. यादरम्यान तक्रारकर्त्यांना आपल्या तक्रारीबाबत काय घडतेय हे देखील बघता येणार आहे. स्वच्छतेबाबत नागपूर शहराला देश पातळीवर पहिल्या १० क्रमांकामध्ये आणण्यासाठी या स्वच्छता ॲप चा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन मनपा दवारे करण्यात आले आहे

• • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# ग्राफिटी वॉल पेंटिंग स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद



**135 चमूने नोंदवला सहभाग**

शहराच्या भिंती सुंदर दिसाव्यात, इतर शहरातून नागपुरात येणाऱ्या नागरिकांना नागपूर शहराची एतिहासिक, सांस्कृतिक ओळख पटावी या उद्देशाने महानगरपालिकातर्फे रविवारी ता. 18 डिसेंबर 2016 रोजी ग्राफिटी वॉल पेंटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, या स्पर्धेला हौशी कलावंत, विध्यार्थी, चित्रकार व नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. 135 चमूने स्परर्धेत सहभाग नोंदवून शहरातील भिंती सुशोभित केल्या. स्वच्छ नागपूर, पाणी वाचवा, बेटी बचाव बेटी पढाव, डिजिटल नागपूर,स्मार्ट सिटी, हैप्पी नागपूर, क्लीन अँड ग्रीन नागपूर, सस्टनेबल नागपूर हे स्पर्धेचे प्रमुख विषय होते. दोन गटात हि स्पर्धा पार पडली. केवळ चित्रकलाचे शिक्षण घेणारे विध्यार्थी व इतर अशा दोन गटातील स्पर्धकांनी 5×3 मीटर च्या भिंतींवर अतिशय सुंदर व सारगर्भीत संदेश देणारे चित्रे साकारली.

**पहिल्यांदा संधी मिळाली**

आमचे नेहमीचे रविवार उशिरा उठण्यात किंवा आढवड्याभरातील उर्वरित कामे पूर्ण करण्यात सरायचे, हा रविवार खूप, खूपच स्पेशल ठरला, आपले नागपूर शहर सुंदर करण्याची संधी मनपाने आम्हाला दिली यासाठी आम्ही त्यांचे खूप खूप आभार मानतो, सकाळी 8 पासूनच आम्ही उत्साहाने कामाला लागलो असे एल.ए. डी. कॉलेजच्या चमूने सांगितले, त्या ' बेटी बचाओ बेटी पढाओ ' हि सुंदर संकल्पना झीरो माईल येथील भिंतीवर साकारत होत्या

**मेट्रोची घोडदौड**

मेट्रो रेल्वे हि आता स्मार्ट सिटी नागपूरची विकासात्मक ओळख बनली आहे, झीरो माईल येथील भिंतीवर विद्यार्थी स्पर्धक स्मार्ट सिटी संकल्पनेत मेट्रो रेल्वे साकारण्यात दंग होते. पुढील भविष्यात मेट्रो हे प्रवासाचे सर्वात स्वस्त माध्यम असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कॉमन मॅन चा स्वच्छ भारत**

स्पर्धकांनी अतिशय सुंदर आणि कल्पक संकल्पना स्पर्धेसाठी त्यांना मिळालेल्या 5×3 मीटर च्या भिंतींवर साकारल्या, यात इंडिया गेट, चारमिनार, लालकिला, ताजमहाल, लॉर्ड बुद्धा टेम्पल इ. भारतातील एतिहासिक स्थळे कॉमन मॅन

स्वच्छ ठेवतोय हि अभिनव संकल्पना येणाऱ्या- जाणाऱ्या नागरिकांना विशेष आकर्षित करून गेली. सस्टनेबल नागपूरची संकल्पना साकारताना येणाऱ्या पिढीसाठी,नागपूर शहाराची ठळक वैशिष्ठे आदर्शवत आणि आकर्षित करीत राहतील या उद्देशाने काही विद्यार्थी भिंत रंगविण्यात गुंग होते. इलेक्टट्रिक जेनरेटर, सोलर वॉटरवर चालणारे डस्ट- बिन इ. अनेक संकल्पना विद्याथ्र्यांच्या उत्साहातून भिंतींवर साकारत होत्या.

हि स्पर्धा निःशुल्क असून 6 तासांचा वेळ स्पर्धकांना देण्यात आला होता. या उपक्रमात iiid व cisfa यांचे विशेष सहायय मनपाला मिळाले. विजेत्यांना उद्या ता. 19 डिसेंबर 2016 रोजी नागपूर महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षीस व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

**या भिंती झाल्या सुशोभित**

मेडिकल हॉस्पिटल चौक

स्मृती थिएटर चौक

अमरावती रोड LIT भिंत

आनंद थिएटर अंडर ब्रिज वॉल

झीरो माईल मिलिटरी कंपाऊंड भिंत

या अनोख्या उपक्रमातील सर्व ठिकाणी महापौर प्रवीण दटके, आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच अनेक नेते,पदाधिकारी व नागपूर शहराच्या नागरिकांनी भेट दिली.शहरातील नागरिकांसाठी हा रविवार जणू रंगांची उधळण घेऊन आला, अनेक नागरिक रस्त्यावर थांबून विध्याथ्र्यांचा उत्साह वाढवीत होते.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# नागपूर होणार लॉजिस्टिक हब . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**संभाजी पार्क येथे 40 कोटींच्या कामाचे भूमिपूजन**

देशाचे मध्यवर्ती शहर म्हणून नागपूरचे स्थान अत्यंत महत्तवाचे आहे. देशात जीएसटी लागू झाली आहे. देशातील सर्वात जास्त लॉजिस्टिक हे नागपूरमधून संचालित होणार आहे. जगातील अनेक लॉजिस्टिक कंपन्या नागपूरला येण्यास आतूर असून यातून 25 ते 30 हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे. याशिवाय संपूर्ण जगाला जोडणारे एअरपोर्ट नव्याने बांधून अद्ययावत कार्गोचे टर्मिनल बांधण्यात येणार आहे असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते शुक्रवार दिनांक 30 डिसेंबर 2016 रोजी छत्रपती चौक येथील संभाजी नगर पार्कमध्ये राष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधांनीयुक्त बॅडमिंटन हॉलच्या भूमिपूजनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी 40 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन तसेच जमिनीवरील विद्युत तारांच्या भूमिगतीकरणाचे उद्घाटन व शिलान्यास मुख्यमंत्री यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी मंचावर महापौर प्रवीण दटके, आ. प्रा. अनिल सोले, मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, शिक्षण समितीचे सभापती गोपाल बोहरे, लक्ष्मी नगर झोनच्या सभापती नीलीमा बावणे, नगरसेविका उषा निशितकर, डॉ. सफलता आंबटकर, मुन्ना यादव, प्रा. गिरीश यादव, प्रा. राजीव हडप, प्रकाश भोयर, पल्लवी श्यामकुळे, धंतोली झोनच्या सभापती सुमित्रा जाधव, जयश्री वाडीभस्मे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, तरुणाईसाठी लवकरच वाठोडा येथे 75 एकर जागेवर कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणारे विद्यापीठाची स्थापना होणार आहे. महानगरपालिकेने यासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. याशिवाय केंद्र शासनाने जी नवीन योजना सुरु केली आहे त्याअंतर्गत जमिनीवरील विद्युत तारांचे भूमिगतीकरण केले जाईल यामुळे जनतेला होणारा त्रास कमी होऊन अपघाताचे प्रमाण कमी होईल. मनपाने नागपूरला देशातील अत्याधुनिक शहर बनवण्यासाठी अनेक प्रकल्प हाती घेतले आहे.

भांडेवाडी प्रकल्पातून कचऱ्यावर प्रक्रिया करुन आता विद्युत निर्मितीची सुरवात झाली आहे. मनपाला या प्रकल्पातील 18 कोटीचे उत्पन्न मिळणार आहे. देशातील सर्वात वेगवान मेट्रोचे काम प्रगतीपथावर आहे. दुसऱ्या टप्प्याच्या रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे कार्य सुरु झाले असून 1 जानेवारी 2018 रोजी स्मार्ट सिटी प्रकल्पावर कार्य सुरु होईल. याअंतर्गत संपूर्ण शहर लवकरच सी.सी. टी.व्ही व वाय-फायने जोडल्या जाईल. पर्यावरणपूरक ग्रीन व रेड बसेस रसत्त्यांवर धावत आहेत. 1997 पासून अनेक नागरिकांना मालकी हक्काच्या पट्टे वाटपाची वाट बघावी लागली होती त्यांना त्यांच्या मालकीचे पट्टे वाटप

करण्यात येत आहे. याशिवाय एस.आर.ए. योजना, प्रधानमंत्री आवास योजना इत्यादी अनेक योजना या मनपाच्या सहकार्यातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनातून सुरु आहे. नासुप्र बरखास्त करुन नागपूरच्या विकासाचा मार्ग आम्ही मोकळा केला. मनपा आणि मेट्रो रिजन यांच्या सहकार्यातून व समन्वयातून शहरातील अविकसित भागांचा विकास घडवून आणला जाईल असे यावेळी फडणसीव म्हणाले. प्रास्ताविक संदीप जोशी यांनी केले. आभार मुन्ना यादव यांनी मानले. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरुपात सिंधी कॉलनीतील पाच रहीवाशांना मुख्यमंत्री यांच्या हस्ते लीजचे पट्टे वाटप करण्यात आले.

**शब्द पाळणारे मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले- महापौर**

यावेळी बोलताना महापौर प्रवीण दटके यांनी विकासाचा शब्द पाळणारे मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले असल्याचे सांगितले. कधी नव्हे ते अडीच वर्षात पाचशे कोटी रुपये नागपूर शहराला विविध विकास कार्यासाठी मिळाले. याप्रसंगी भूमिपूजन करण्यात आलेल्या संभाजी पार्क येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक चार बॅडमिंटन कोर्ट बांधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नासुप्र बरखास्त करुन मुख्यमंत्री यांनी शहराला फार मोठी देणगी दिली आहे आता नागरिकांसाठी सर्वात चांगले काम करण्याची जबाबदारी ही निश्चित झाली आहे. नागपूर महानगरपालिका नागरिकांप्रती आपल्या कामांसाठी जबाबदेही राहणार असल्याचे अभिवचन यावेळी महापौरांनी दिले.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# गांधीबाग झोन क्रमांक ६ करिता २५ लाखांचे जेसीबी मशीन



**१६ लाखांचे टिप्पर यांचे लोकार्पण**

गांधीबाग झोन क्रमांक ६ करिता २५ लाखांचे जेसीबी मशीन आणि १६ लाखांचे टिप्पर यांचे लोकार्पण शनिवार दिनांक ३१ डिसेंबर २०१६ रोजी महापौर प्रवीण दटके यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी स्थायी समितीचे सभापती सुधीर राऊत, सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, शिक्षण सभापती गोपाल बोहरे, स्थापत्या समितीचे सभापती सुनिल अग्रवाल, विद्युत विभागाचे सभापती प्रा. गिरीष देशमुख, गांधीबाग झोनच्या सभापती विद्या कन्हेरे, नगरसेवक प्रकाश तोतवानी, राजेश घोडपागे, सहा. आयुक्त अशोक पाटील, उप अभियंता रवी बुंधाडे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुजा अर्चना करून नारळ फोडून या यंत्राचे रितसर उद्घाटन करण्यात आले.

• • • • • • • • • • • • • • • • • • • • • •

# 26 जानेवारी 2017 या प्रजासत्ताक दिनी नागपूर महानगर पालिकेच्या विद्यार्थांना नागपूरचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली



**26 जानेवारी 2017 या प्रजासत्ताक दिनी नवी दिल्ली येथे गणतंत्र परेड मध्ये आदिवासी नृत्य सादर करणार**

२६ जानेवारी गणतंत्र दिवस नवी दिल्ली येथे उत्साहात साजरा करण्यात येतो, यात नागपूर महानगर पालिकेच्या विद्यार्थांना या वर्षादेखील नागपूरचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. शेषराव वानखेडे विद्यानिकेतन, रामदासपेठ तसेच वाल्मिकीनगर हिंदी हायस्कुलच्या विद्यार्थांना दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्रातर्फे आदिवासी नृत्य सादर करण्याची संधी मिळाली आहे. शनिवारी दिनांक ३१ डिसेंबर २०१६ रोजी महापौर प्रवीण दटके, आयुक्त श्रावण हर्डीकर, शिक्षण सभापती गोपाल बोहरे यांनी आदी मान्यवरांनी शुभेच्छा प्रदान केल्या. याप्रसंगी त्यांना विवीध भेट वस्तु देऊन अभिनंदन करण्यात आले आहे.

•••••••••••••••••••••